## : ३ : सर्वच नसती , आप्त

ती र्थकृत्समयानां च परस्पर विरोधत : |

सर्वेषां आप्तता नास्ति, कश्चिदेव भवेद्गुरु : || ३ ||

अर्थ : आणि आता तुम्ही म्हणता की मी ती र्थंकर, धर्मती र्थाचा निर्माता आहे, आगमांची निर्मिती करणारा आहे, तर तेही मला नाही पटत. कारण स्वत:ला ती र्थंकर म्हणवून घेणारे बुध्द, कपिल कणाद वगैरे ही मंडळी आहेत. त्यांच्यात एकमत नाही . परस्पर विरोधी ते सारे एकमेकासमोर उभे ठाकले आहेत. असे असता, इतके सारे विरोधाविरोधी ती र्थंकर हे आप्त कसे होऊ शकती ल ? साऱ्यात आप्तपणा कसा असेल? त्या साऱ्यात कुणी तरी एखादाच खरा गुरु असेल.

स्पष्टार्थ विवेचन : याही कारिकेत एक संवाद आहे. प्रभू म्हणतात - हे भल्या माणसा, हे तर खरे ना की मी ती र्थंकर आहे. धर्मती र्थीची निर्मिती मी केली आहे. ती र्थावतार म्हणून लोक माझी स्तुती करतात. तेव्हा मला आप्त म्हणून स्वी कारायला तुझी अडचण असू नये.

या कारिकेतून एक वेगळा मुद्दा उपस्थित केला जात आहे. सारे जैन ती र्थंकरांना श्रेष्ठ मानतात. त्यांची वंदना, स्तुती , पूजा - अर्चा करतात. तेव्हा आप्तपणाच्या सिध्दतेसाठी ' ती र्थकरत्व ' हा उत्तम व श्रेष्ठ असा हेतू आहे. पण आचार्य तोही हेतू नाकारतात. त्यांना हे माहिती आहे की ती र्थंकरत्व हा हेतू देखी ल कार्यकारी नाही आहे. मोठे धाडसाचे विधान आचार्य करतात. आपण अजाणतेपणाने ती र्थंकर शब्द वापरतो. ती र्थंकर म्हणजे आप्त, ती र्थंकर म्हणजे खरा देव असे म्हणतो.

पण आचार्य म्हणतात - हे जे ती र्थंकरत्व आहे, तो काही आत्म्याचा गुण नाही . ती कर्मजनित उपाधी आहे. ती र्थंकर नाम कर्माचा उदय असल्याने तुम्ही ती र्थंकर आहात. तेव्हा आपला हा जो मोठेपणा, महानता आपण सांगत आहात तोही कर्मोपाधी असल्याने आम्ही स्वी कारू शकत नाही . कारण ती र्थंकर नसणारे देखी ल अनेक भव्य आत्मे मोक्षरूप झाले आहेत. श्री भरत, श्री बाहुबली हे ती र्थंकर नव्हते. पण निर्वाण सुखाचे महनी य अधिकारी झाले. तेव्हा तुमचा ती र्थंकरत्व हा देवपणाचा हेतू होऊ शकत नाही .

दुसरे, या देशात असे अनेक लोक आहेत, बुध्दासारखे, की जे स्वत: ला ती र्थंकर म्हणवून घेतात. तेही खात्री देतात ही या आमच्या विचार प्रवाहात, आम्ही देखील तुम्हाला निर्वाण सुखाची प्राप्ती करून देतो. ते सारेच जण नव - नवीन ती र्थ उभी करणारे आहेत. तेही स्वत: ला सर्वज्ञ, हितोपदेशी , मोक्षपथ प्रदर्शक म्हणवून घेतात. त्यांचेही तत्वज्ञान आहे. त्यांचेही आगमे आहेत. अशा मतामतांचा गलबल्यात खरा आप्त शोधने कठीणच नव्हें काय ? बुध्दांचे त्रिपिटक आहेत, सांख्यांचे वेगळे तत्वज्ञान आहे, खिश्चनांचे, मुस्लिमांचे, पारशांचे वेगवेगळे गुरू , वेगळे वेगळे देव आहेत. तेव्हा आम्ही तर परीक्षा घेऊनच निवड करणार आहोत. जितकी काही विचारवंत मंडळी विद्यमान आहेत किंवा पुढेही होतील त्या साऱ्यांना त्यांची त्यांची जागा तर दाखविली पाहिजे. आमच्या देवाच्या देव्हाऱ्यात कुणाला तरी आणून बसवणे आम्हाला नाही जमणार. ‘ सर्वेषां आप्तता नास्ति ’ हे आचार्यांचे सूत्र ध्यानी ठेवणे आवश्यक आहे. एखादा माणूस असा असतो की तो म्हणतो की कोणता देव खरा, हे जर आपणाला कळत असा असतो की तो म्हणतो की कोणता देव खरा, हे जर आपणाला कळत नाही , तर मग विद्यमान सारे देवच मंदिरात आणून ठेवून समन्वय साधू या. आचार्य म्हणतात की ही काही समन्वयाची बाब नाही आहे. सोनेही ठेवायचे व पितळही ठेवायचे, हे काही ज्ञानी पणाचे लक्षण नव्हे. परस्पर विरोध दिसत असेल तर तो विरोध का आहे, कुठे आहे तो विरोध ? साम्य कुठे आहे ? तेव्हा आम्ही तर परीक्षा करू , कस लावून पाहू. मग निर्णय करू की खरा आप्त कोण ? विरोधी विचारांची आम्हाला काही भीती नाही आहे. काही ठिकाणी विरोध (कॉंट्रडिक्टरी ) दिसतो, तोही खरा आहे की तो कॉंप्लिमेंटरी ? ते सारे स्वच्छ तपासले पाहिजे. ज्ञानशक्ती चे हेच ता कार्य आहे. ती ज्ञानशक्ती म्हणजेच तर आगम आहे. तेच तर ती र्थ आहे. ज्ञान नसेल तर निवाडा कसा होईल आणि निवाडा करताना पक्ष - प्रतिपक्ष यांची बाजू तर ऐकली पाहिजे. प्रत्येकाने हेतू (मुद्दे) उपस्थित केले आहेत ते तंतोतंत खरे आहे की नाही , हे आम्हाला पाहिले पाहिजे. बाबा वाक्यं प्रमाणाम् हे आम्ही कधीच स्वीकारत नाही . खोटेपणा आहे की नाही , हे देखील आम्ही जाणून घेणार आहोत. हे प्रभो, तुम्हाला सोडून अन्य ती र्थंकर, जे भिन्न मतांचे आहेत, त्यांचे म्हणणेही आम्ही ऐकून घेणार आहोत. कारण त्यांच्याही मतात सत्यांश असण्याची शक्यता नाकारता येत नाही . आम्हाला स्वत:ला हठाग्रह पसंत नाही . आम्ही तर अनेकान्ताचे पुत्र आहोत. त्या

अनेकान्ताचे पुत्र आहोत. तोच तर आमचा सर्वोत्तम वारसा आहे. त्य अनेकांताच्या कसोटी वरच घासून, पुसून, सुलाखून आम्ही आप्तत्वाचा शोध घेणार आहोत.

चकाकते ते सारे सोने नव्हे, हे आम्ही जाणतो. स्वत:ला तीर्थंकर म्हणविणाऱ्यांच्या या गराड्यातून नेमके खरे तीर्थंकरत्व कुणाच्या ठायी आहे, याचाच तर आम्ही पाठ पुरावा करीत आहोत. जर असे सिध्द झाले की आपणच खरे परमश्रेष्ठ तीर्थंकर, सर्वज्ञ, हितोपदेशी, दोषमुक्त आहात, तर आमचे शतश: वंदन आपल्याच चरणी असतील.

दुसऱ्या गर्भितरीतीने, सूक्ष्मपणे आचार्य जणु खऱ्या आप्ताची लक्षणेच या कारिकेतून सांगत आहेत. ते असे-गुरू (आप्त) हा तीर्थनिर्माता असावा. म्हणजे तीर्थाचा (मोक्षमार्गाचा) निर्माता असावा. मुक्ती मार्गाचे नेतृत्व करण्यास पात्र (अर्हत्) असावा. तो सर्वज्ञ (ओम्निसाएंट) असावा. म्हणजे तो जे सांगेल, उपदेश देईल, त्याची जी देशना असेल ती स्वच्छ, निर्मळ परस्पर अविरोधी व जीवमात्रांचे कल्याण करणारी असावी. म्हणजेच त्याने स्व - समय (आत्मापरमात्मा) आणि पर-समय (अचेतन विश्व) यातील भेद स्पष्ट केला पाहिजे. तिसरे, तो इतर सर्वांच्या (स्वत:ला आप्त म्हणविणाऱ्यांच्या) पेक्षा वेगळा असावा. म्हणजेच आप्त हाच, असाच, दुसरा नाही, दुसरा असू शकत नाही, अशी चतुर्विध श्रध्दा आमच्या मनांत निर्माण झाली पाहिजे.

याचा स्पष्टार्थ म्हणजे 'भेत्तारं कर्म भूभृतां' स्वरूपाचे त्याचे रुप असावे. पूर्व संचित कर्म, कर्म फळे, कर्म चेतना या पासून तो मन - वच - काये करून मुक्त असावा. तो निर्ग्रंथ, अपरिग्रही, अनाकुल, सतत आनंदाच्या पवित्र, निर्मळ, शीतल डोहात मग्न असणारा असावा. एकीकडे कसा आप्त नसावा, हे सांगतांना त्याच प्रश्नांची जी पॉझिटिव्ह (सकारात्मक) मांडणी आहे, ती ही महत्त्वाची आहे. कर्म बंधातून म्हणजे ज्ञानावरण, दर्शनावरण, मोहनीय व अंतराय या चार कर्मापासून तो आत्मामुक्त हवा. संयम, तप यांनी त्या चार कर्मांचा नाश करणे हे फार महत्त्वाचे आहे. अशी अर्हत् अवस्था प्राप्त न केली गेली तर त्याची आप्तावस्था प्रमाण मानता येत नाही. जरी कुणी स्वत: ला तीर्थंकर, आप्त, सर्वज्ञ म्हणवून घेत असला तरी ते खरे नव्हे. अशारीतीने इतर साऱ्या विकारी, वस्त्रधारी, अलंकारयुक्त देव- देवतांना आचार्य या गाथातून नकार देत आहेत.

भयाशा स्नेह लोभात्च कुदेवागम

लिंगिनां प्रणामं, विनयं चैव

न कुर्यु: शुध्द दृष्टय:॥

असा स्पष्ट निर्वाळा आचार्यांनी आपल्या रत्नकरंड श्रावकाचारात दिला आहे. तो देव-देवतांच्या उपासनेबाबत लक्षात ठेवायला हवा. त्याचे कारण हि असेच आहे. श्रध्देला दृढता येण्यासाठि ती श्रध्दा डोळस कशी राहिल, ती भयाने, आशाळभूतपने, स्नेहाने, वा लोभाने कलंकित कशी होणार नाही, हे पाहिल्याशिवाय त्या श्रध्देचे खरे रूप प्रगट होणार नाहि.

: ४ : निर्दोष आप्त - दर्शन

दोषाऽऽ वरणयोर्हानि र्नि:शेषाऽस्त्यतिशायनात्।

क्कचिद्यथा स्वहेतुभ्यो बहिरन्तर्मलक्षयात्॥ ४॥

अर्थ : असे समजू नका की असा कोणताहि आप्त (देव) सापडणे शक्य नाहि की ज्याने सर्व दोषांचा किंवा कर्मावरणांचा नाश केला आहे. कारण असे स्पष्ट दिसते की दोष व कर्म यांचा अल्प वा पूर्णत: नाश करणाऱ्या व्यक्ति - विशेष दिसून येतात.

स्पष्टार्थ विवेचन : या कारिकेतून आचार्य अशा शंकेचे निरसन करतात की कुणी असे म्हणेल की अशी दोष - रहित, व कर्मकलंकांनी रहित व्यक्तीच सापडणे शक्य नाहि. त्यावर आचार्य म्हणतात - जसे, सुवर्णमिश्रित मातीतून उत्तम, श्रेष्ठ सोने प्राप्त होते, तसे सर्व दोषांचा क्षय करून व आत्मतेज संपन्न होऊन दिव्य असे देवत्व प्राप्त होण शक्य आहे. असा शक्यतेचा बोध महत्त्वाचा आहे. आवरण आहे, तर निरावरणहि होता येणे शक्य आहे. मोह आहे, राग - द्वेष आहेत, त्या दोषांचा पूर्णत: नाश होणेहि शक्य आहे. म्हणजेचे निर्दोषता, कर्ममलापासून मुक्ती मिळविणारे आप्त दुर्मिळ नाहित.

या कारिकेतून अरिहंताबद्दल जी एक चुकी चे कल्पना अनेकांच्या मनात दृढ आहे की असा युग पुरुष, असा कर्म - मलांनी रहित, अत्यंत निर्दोष, सर्वज्ञ पुरुष प्राप्त होण शक्य नाही . म्हणूनच ज्याने स्वत: च्या कबळावर तपाने, संयमाने, ध्यानाने कर्ममलांचा नाश केला आहे, तोच आप्त होय, तोच खरा देव होय. त्याची च उपासना, पूजा, भक्ती , वंदना करणे श्रेष्ठ होय.

येथे 'स्व - हेतुभ्यो' हा शब्द फार महत्त्वाचा आहे. कर्म वा दोष यांचा नाश करायचे कार्य स्वत: आत्माच करतो. यातून आत्मजागृती चे संकल्पना स्पष्ट केली आहे. आत्म्याती ल जे अनंतवी र्य आहे, अनंत सामर्थ्य आहे, त्याच्या बळावर, त्याच्या साधनेने ज्ञानाचे अनंतत्व साध्य करता येते.

याचा विचार करतांना जैन आगमात जो भेद - विज्ञानाचा विचार मांडला आहे, तो ध्यानी घेतला पाहिजे. भेदविज्ञान म्हणजे आज कर्मसंयोगाने जी आत्म्याची संसारिक स्थिति आहे, भवभ्रमण आहे, जन्म - मृत्यु आहे त्यातून मुक्तता शक्य आहे, हा विचार म्हणजे भेदविज्ञानाची सुरूवात आहे. आत्म्याच्याठायी स्वयमेव अत्यंत शुध्द - विशुध्द होऊन परमात्मपद प्राप्त करण्याची स्वयंभू शक्ती आहे. ती जर जागृत झाली , तसा दृढ निश्चय झाला की मग चैतन्याचा विशुध्द आविष्कार होत जातो. म्हणजेच अर्हत्पद प्राप्त होऊ शकते.

यातून अशी मान्यता, असा भ्रम दूर करण्यात येत आहे की मी केवळ भक्ती च करी त राहाणार, मला परमात्मपद प्राप्त करणेच अवघड आहे. ही त्याची असमर्थता यातून दूर करण्यात येत आहे. भक्त आहे तोच परमात्मा होतो. म्हणजे प्रत्येक जी व हा स्वतंत्र, स्वयंभू व स्वत:च्या निर्दोषतेचा, कर्ममुक्ती चा स्वयमेव हेतू आहे. म्हणजे दुसरा कुणी तरी ईश्वर कुणा जी वाचा उध्दार करी ल, त्याला स्वर्ग, मोक्ष सुख देईल, संपत्ती , वैभव, समृध्दी देईल अशा मान्यतेचा येथे विरोध आहे. प्रत्येक जी वात परमात्मा होण्याची , निर्दोष व कर्ममुक्त होण्याची स्वयंभू पात्रता आहे, हा विचार आचार्य श्री प्रकर्षाने मांडत आहेत.

आजच्या जी वात दोन प्रकारचे दोष आहेत, कलंक आहेत. एक अंतरंगाती ल अज्ञान, मोह व देह व आत्मा एकच आहेत, अशी भ्रांती . बहिरंगाती ल दोष म्हणजे क्षुधा, तृषा, निद्रा, रोग - राई इ. शरी राच्या व मनाच्या आश्रित दोष. इंद्रिये व मन प्रत्येक संज्ञी प्राण्याच्या ठिकाणी आहेत. ती इंद्रिये व मन सदोष आहेत. विकारी आहेत. त्यांचा ओंढा सतत बाह्य - विश्वाकडे, भौतिकतेकडे, भोगोपभोगाकडे. त्यामुळेच सतत मन मलिन होत जाते. विकार वासनांनी ते स्वहित पाहू शकत

नाहि . आत्मा जाणू शकत नाहि . अशा दोन्ही प्रकारच्या मलिन अवस्थेतून दूर होण्याची शक्ती जी वात आहे. ते सामर्थ्य स्वयंभू आहे. अंतरनंगातच आहे, आत्म्यातच आहे. केवळ ते तेज जागे करायचे आहे. ती जागृती करण्याचे कार्य अशा श्रेष्ठ देव - आराधनेतून होणे शक्य आहे. तो आदर्श आहे भक्ताचा. सतत त्या आदर्शाची उपासना, पूजा, भक्ती , चिंतन करीत राहिल्यास अज्ञानापासून, मोहापासून, अश्रध्देतून मुक्त होता येते.

आप्ताचा शोध घेता घेता व आप्ताशी नाते जोडता जोडता फार मोठा विचार स्वामी समंतभद्र सांगत आहेत. ते म्हणतात की तुम्हीच, स्वतः मोक्षहेतू आहात, परमात्मा आहात, समग्र चैतन्यमयच आहात, म्हणजेच तुम्हीच गुरू व तुम्हीच त्याचे शिष्य.

तुम्ही तुमच्या शिवाय अन्य गुरू शोधत फिरू नका. आत्म्यालाच गुरू करा, त्या आत्म्यातील अनंत ज्ञानाला, अनंत वीर्याला गुरू करा. तुम्ही स्वतः भोवती जे तारेचे कुंपन घातले आहे की मी संसारी आहे, मलिन आहे, कर्मबध्द आहे, असमर्थ आहे, पामर आहे. ती सारि कुंपणे अगोदर दूर सारा. ती सारि र घाण- कचरा नष्ट करून टाका. स्वच्छ, निर्मळ व्हा. स्वच्छता हाहि आत्म्याचाच गुणधर्म आहे. सर्व कर्मांची , कर्मफळांची वासनेची जळमटे स्वच्द केल्यामुळेच निर्दोषता येते. असा निर्दोष परमात्मा जन्मणे, पाहाणे, अनुभवणे, त्याला समर्पित होणे शक्य आहे, हि भावना जागृत केली तरच तो कदाचित ती तुमची नित्याची सवय होऊन जाईल. तुमचे ते वंदन परमात्म्याप्रत नाहि पोहचणार. तुमच्या पूजेत, स्तुतीत, वंदनेत जर मलिनता असेल, विकार असतील, लोभादिक कषाय असतील तर मग तुमचे ते वंदन खरे असणार नाहि .

शिष्यत्व किंवा भक्तपणा यांचा जन्म हृदयात जर झाला नसेल, तुम्ही कुणाचे शिष्यत्वच पत्करले नसेल, भक्त होण्याचे टाळत असाल तर तो गुरू काय करणार ? तुमचा शोध महत्त्वाचा आहे. तुमची भक्ती महत्त्वाची आहे. ती भक्ती कधी मौन असते तर कधी शब्द रुपाने प्रगट होते. सारे स्त्रोत्रे भक्ती गीते त्या प्रगाढ श्रध्देतून जन्मातात. अशी श्रध्दा असेल तर मग कोणताहि गुरू तुम्हाला मार्गदर्शन करील. दगडहि मार्गदर्शन करील. पण तुम्ही त्या दगडाचेहि ऐकले पाहिजे. त्याचाहि मूक संदेश स्वीकारला पाहिजे. कागदावर आपण जे लिहितो, ते खरे तर अचेतनच आहे. आगमे, शास्त्रे, वचन, उपदेश सारे अचेतनच आहेत. पण तुमची चेतना जर जागी होणारी असेल, तुमच्या पायात चालण्याचे बळ असेल तर ती सारि अचेतन सामुग्रीहि उपकारक ठरते. म्हणू नका की अचेतन काय करील ? एक काठि हातात धरली तर लंगडा

माणूसही चालू शकतो. चष्मा घातला तर दिसू शकते. लेन्स डोळ्यात बसविले तर दिसू शकते. अचेतनही चेतनेला मदत करीतच असतात. तेव्हा आचार्य म्हणतात की तुम्ही जर आप्ताच्या शोधात निघालात तर तो खात्रीने सापडेल. कारण तुमचे समर्पण महत्त्वाचे आहे. ते समर्पणच तुमची दीप होईल. आचार्य श्री जरी खऱ्या आप्ताचन चर्चा करीत असताना दिसतात, तरी ते काही अन्य कुणाला दूषण देत नाहीति. ते तर उत्तम भक्त आहेत. त्यांची भक्ती, त्यांनी निष्ठा - श्रध्दा समोरच्या कु- देवांनाही सू- देवात परिवर्तित करील. कु-गुरू ही सु-गुरू होऊन जाईल. कारण त्यांचे समर्पण आहे ते खऱ्या देवाच्याच स्वयंप्रकाशित कोवळ्या उन्हात ते उभे आहेत. त्यांची श्रध्दा अविचल आहे. त्यामुळेच तर त्यांचा शोधही आकर्षक आहे, पावन आहे. तसेच तुमचेही आहे. तुम्ही जसे, अस्वच्छ पदार्थाला, अमंगळ पदार्थाला स्वच्छ म्हणत नाही आहात, तसे. तुमच्या मनातही तोच निष्कलंक, निर्दोष, परमपवित्र परमात्माच आहे. ‘ दोष व आवरण हे काही तुमचे नाही. डोक्यावर पागोटे बांधले खरे. पण पागोटे म्हणजे तुम्ही नाही. तसे आज जरी तुम्ही संसारी आहात, मोही दिसताहात, कु-गुरू, कु-देवांच्या भक्तीस रस घेत असल्याचे दिसत आहात, तरी तुम्ही आंतून संसाराचा उच्छेद करण्याचा, आप्तत्व निर्मितीच्या प्रयत्नातच आहात. अभिनय असा करता आहात की जणु तुम्ही खरे संसारी आहात. तो अभिनय सोडला, ते विकार - वासनांचे वस्त्र दूर केले की साक्षात् आप्तत्व तुमच्या समोर दत्त म्हणून उभे राहील.

<u>: ५ : जे ज्ञात नसे तुम्हा, इतरांना ते ज्ञात असे</u>

सूक्ष्मान्तरित दूरार्थाः प्रत्यक्षाः कस्यचिद्यथा |

अनुमेयत्वतोऽग्न्यादिरिति सर्वज्ञ संस्थिति : || ५ ||

अर्थ : सूक्ष्म, अंतरित आणि दूर असलेले पदार्थ कुणाला तरी ज्ञान असतात, केव्हातरी ज्ञात असतात. जसे, धूर दिसत असला की अग्नी चे ज्ञान होते, तसे विश्वाती ल यच्चवत पदार्थांचे ज्ञान ज्याला आहे, असा सर्वज्ञ असणे शक्य आहे.

स्पष्टार्थ विवेचन : या कारिकेतून आचार्यश्री केवळ डोळ्यांनी प्रत्यक्ष दिसते, तेच सत्य, इतर प्रमेये सत्य नाही त, असे जे मानतात, त्यांच्या मनाती ल भ्रम दूर करतात. ही कारिका यासाठी की 'सर्वज्ञपणा' शक्य आहे. ती काही कल्पित गोष्ट नाही . जैन विज्ञानाची प्रकर्षाने मांडणी अशी की प्रत्येक जी वाला सर्वज्ञत्वाची प्राप्ती शक्य आहे. आता जे ज्ञान प्राणी मात्राला आहे, ती ज्ञानाची किरणे कोठून येतात, कोण आहे त्या किरणांचा मालक, जनक ? म्हणजे आज जे मतिज्ञान व श्रुतज्ञान जी वाला आहे, ती ज्ञानाची म्हणजे कैवल्याची च आभा आहेत.

येथे आचार्य सांगतात की काही पदार्थ सूक्ष्म आहेत. जसा अणू. अणू दिसत नाही . पण तो जाणता येतो. तेव्हा सूक्ष्म वस्तूंचे ज्ञान शक्य आहे. तसेच ज्या पदार्थात स्थळाचे, कालाचे अतंर आहे, म्हणजे जे भूत काळात प्रविष्ठ झाले किंवा भविष्य काळात होणारे आहेत तेही जाणता, पाहाता किंवा अनुभवता येतात. म्हणजेच आम्ही जी सर्वज्ञाची मांडणी करतो ती देखी ल सत्य स्वरूपच आहे. सर्वज्ञत्व ही काही कल्पना नाही , काल्पनिक थोतांड नाही , ती वस्तुस्थिती आहे. असे सर्वज्ञत्व ज्याला प्राप्त आहे, तोच आमचा आप्त. तोच खरा देव.

जसे, आपण अमेरिका येथून पाहू शकत नाही . खूप दूर आहे. पण ती , तेथी ल माणसे. त्यांचे उद्योग इ. पुस्तकांच्या, टी . व्ही . च्या माध्यमातून पाहू शकतो. तसेच काही पदार्थ दूर आहेत म्हणून ते आपण जाणू शकत नाही , असे नाही . ज्ञानाची कक्षा आता खूपच विस्तारत आहे. म्हणूनच आजच्या विज्ञानाने देखी ल सर्वज्ञत्वाचे खरेपण, सत्यता सिध्द होऊ शकते. आपणाला जे प्रत्यक्ष नाही आहे, ते अन्य कुणाला तरी प्रत्यक्ष असू शकते. म्हणून मला कळते तेच खरे, असे नव्हे तर इतर ज्ञानी माणसांना जे ज्ञात होते, तेही खरे आहे. चंद्रावर माणूस जाऊन आला, त्याने तेथी ल प्रत्यक्ष ज्ञान करून घेतले. ते काही खोटे नाही . तसेच आगमात जी वर्णने आहेत, स्वर्गादिकांची ती कुणाला तरी साक्षात् व प्रत्यक्ष आहेत.

यासाठी सूक्ष्मत्व (वस्तूंचे), अंतर (काळाचे, स्थळाचे) यामुळे काही ज्ञान अडून राहात नाही . ज्ञान प्रत्यक्ष ही जाणते, परोक्षही जाणते किंवा अनुमानानेही जाणते. म्हणून असे नका म्हणू की सर्वज्ञपणा हा कपोल कल्पित आहे. कारण आत्मा ज्ञानं स्वयं ज्ञानं, ज्ञानात् अन्यत् करोति किं

यातून हेच ध्वनित होते की आत्मा ज्ञानमय असल्याने त्याला विश्वाचा वेध घेण्यात कसलाही अडथळा नाही. म्हणून असे कैवल्य, सर्वज्ञत्व हे जे गुण आम्ही परमात्म्याचे, आप्ताचे मानतो त्यात काही एक गफलत नाही. ते निर्विवाद असे तत्व आहे. या कारिकेतून सर्वाज्ञपणाची सिध्दी आचार्यांनी केली आहे व त्याच्या विरोधात जे आक्षेप घेतले गेले किंवा घेतले जातील त्याचे स्वच्छपणे निराकरण केले आहे. म्हणजे जे देव सर्वज्ञपणाला प्राप्त नाही झाले व अद्यापि संसारिक कांक्षणेतच गुंतले आहेत, राग-द्वेषांनी मलीन आहेत, ते आप्त म्हणून स्वीकारता येत नाहीत.

: ६ : भगवंत, तुम्ही च ते निर्दोष आप्त

---

स त्वमेवाऽसि निर्दोषो, युक्ति-शास्त्र-अविरोधि वाक्।

अ- विरोधो यदिष्टं ते, प्रसिद्वेन न बाध्यते ।। ६।।

अर्थ: हे प्रभो, आपणच ते निर्दोष वीतराग व सर्वज्ञ व्यक्तिमत्व आहात, (जे मला इष्ट आहे) कारण तुमची वाणी ही युक्ती युक्त (reasonable) आहे, त्यात विरोधीपणा नाही आणि महत्वाचे म्हणजे जे वैज्ञानिकपणे सिध्द आहे त्यासही विरोध येत नाही.

स्पष्टार्थ विवेचन : या कारिकेतून भगवंताच्या वचनाचखी आचार्य स्तुति करीत आहत. जी पवित्र पावन, कल्याणकारि जिनवाणी आहे, ती निर्दोष, निराकुल, निर्मोही व्यक्तिची आहे. तशी च ती वाणी युक्ती, आगम (येथे भाव-आगम) व परस्पर विरोधरहित आहे आणि प्रसिध्द आहे म्हणजे वेगवेगहया दृष्टी ने व प्रमाणाने सा-या वेगवेगहया कथानांनाही आपल्या चातूर्याने सामावून घेते. आचार्यानी स्पष्टरीतीने अरिहंताच्या स्तुती बरोबरच त्यांच्या वाणीलाही सुप्रतिष्ठित केले आहे. जैनांच्या आगमात परस्पर कूठेच विरोध नाही. जेथे जेथे विरोध जाणवतो, तेथे तेथे नय व प्रमाण म्हाजे वेगळ्या वेगळ्या दृष्टीकोनातून ते कसे योग्य आहे, कितपत योग्य, याची ही मांडणी केली

आहे. जेव्हा वस्तूल नित्य म्हटले, तेथे ती अनित्यही कशी आहे, याचे सुयोग्य रीतीने दिग्दर्शनही केले आहे. ते सारे कथन स्यादवादमय आहे. म्हणजे जे जेथे सुव्यवस्थित आहे, ते तेथे स्वीकारले गेले आहे. अज्ञान, हट्ट, आग्रह नसल्याने प्रभूंची सारी वचने ही सत्य आहेत. अनेक तत्वज्ञानी माणसे ही दुराग्रहाने स्वत:चेच कथन सर्वोपरि सत्य आहे असे सांगतात. पण आपल्या वचनात आग्रह, दुराग्रह किंवा एकात नसल्याने ती पवित्र वचने मनाला शांता, सुख व समाधान देणारि आहेत. या कारिकेत तुम्ही पहाल की पवित्र जिवाणीचे उदगते अरिहंत हेच कसे निर्दोष वाणीचे कथन करणारे आहेत. त्वमेवाऽसि यातून आचार्यांची श्रध्दा किती सशक्त आहे, किती दृढ आहे, हे दिसून येते. अन्य जे काही तत्व प्रतिपादक आहे, स्वत:ला सर्वज्ञ, तत्वोपदोक, गुरु किंवा आपत म्हणून घेत आहेत, ते खात्रीनेच गुरु नाहीत, वा आप्त नाहीत. आचार्य तुमच्या श्रद्धेची तपासणी करता येते. तेथे चुकुनही अरिहंताना सोडून अन्य मत-मतांतरांच्या प्ररुपकाबदल त्यांचे प्रेम नाही, श्रध्दा नाही. सर्व देव वा धर्म समभावापेक्षाही तेथे जाणती, डोळस श्रध्दा महत्वाची आहे. जसा लहानसा बालक आपल्या आईलाच आई म्हणाता, जाणते, समजतो. तेथे तडजोड नाही आहे. अन्य कुणीही स्त्री त्याची आई होऊ शकत नाही. ती अन्य स्त्री खूप सुंदर असली, धनवान-धीमन असली तरि तिचा स्वीकार आई म्हणून ते बालक करीत नाही. त्या मातेबदल जी जाण, जे प्रेम, जी श्रध्दा आहे, त्यातून अन्य स्त्रिया त्याच्या माता नाहीत, असू शकत नाहीत आणि सत्यस्थिती प्रगट होते.

तसेच जो अरिहंताच्या प्रती आच निष्ठात्वान आहे, त्या अरिहंतानाच जो आप्त म्हात, जाणाता, तशी प्रतीती करतो तो इतर आप्तानां, शास्त्राना, अगमांना स्वत:चे समजत नाही. अशी जी पूर्णत: समर्पणाची रीत आहे, तेथेच खरा भक्तीभाव असतो. ज्यांना जे इष्ट असेल, प्रिय असेल ते ते त्यांनी अवश्य स्वीकारावे, परंतु ते स्वीकारताना अधंश्रध्दा नको, अविवेक नको किंवा मोहही नको, आचार्य स्वत: उत्तम नैय्यायिक आहेत. न्याय शास्त्रात परंगत आहेत. जे काही स्वीकारायचे ते अंधपणे नाही स्वीकारायचे. त्या तत्वांना तावून-सुलाखून, कसोटीवर घासून स्वीकारले पाहिजे. जसे, आजचे वैज्ञानिक हे सारे पदार्थ, त्यातील गुणधर्म, त्यांचा उपयोग, तंचा इन्फ्रा स्ट्रक्चर तपासून, जोखून, प्राग करुन स्वीकारतात, ती तरीत आचार्यांची अहे. ते अंधतेने काहीही स्वीकरीत नाही. प्रत्येक वाक्य, प्रत्येक शब्द ते तपासून पाहातात, मगच ते स्वीकारतात. येथे बुध्दिनिष्ठेला, नयांना, प्रमाणांना महत्व आहे. पुराणात असे आहे, शास्त्रात असे आहे म्हणून

काहि ते स्वी कारत नाहि . ज्ञान हि अनुपम शक्ती आहे. ती अत्मयाची आहे. इतकेच यनव्हे तर सर्वज्ञता म्हाजेच आत्मा, हा विचार ते स्वी कारतात. जो तत्वचिंतक सर्वज्ञत मनी त नाहि , तो ज्ञानी नव्हे. कारण जे त्याचे जाणणे आहे, ज्ञान आहे, समजून घेणे आहे, ते अंतरंगात दृढपणे ठाण मांडून बसलेल्या कैवल्यातूनच आले आहे, येत आहे, येत राहि ल. कारण कुणी हि त्या परम पावन कैवल्याचा निषेघ करु शकत नाहि . त्या कैवल्य सूर्याची च किरणे म्हण, आभा म्हण, तेज म्हण, आहेत. एकेंद्रिय जी वाला जे ज्ञान आहे, थोडे असेल, अल्प असेल, पण ते सूक्ष्म ज्ञान हि कैवल्य प्रभेचाच प्रकाश आहे. जैन आचार्यानी प्रभू अरिहंताना केली , सर्वज्ञ म्हट ले, ते त्याच अर्थाने होय. प्रत्येक जी वाती ल ज्ञानशक्ती आज जरी कमी -जास्त दिसत असली तरी त्या शक्ती च्या प्रगटी करणाला अनेक विरोधी पदार्थ अडथळे आणत असती ल तरी ज्ञानसूर्याचे अस्तित्व कधी च विनष्ट हात नाहि . म्हणून ज्ञानी माणसाने अरिहंताचे सर्वज्ञत्व स्वी कारले तर अनेक विवाद, विसंवाद, कृर्तक नष्ट होती . हि जी ज्ञानाची अनंतता आहे, ती च ख-या अर्थाने विश्वाचे अनंतत्व जाणते, पाहाते, अनुभवते, म्हून प्रभू केवली चे जे सर्वज्ञत्व आहे, ते विवादाती त आहे. त्याचे काररण मोठे मनोरंजक आहे. अपूर्णता तर ज्ञानात आज अनुभवास येते. पण त्या अपूर्णतेतूनच पूर्णत्वाचे दर्शन घडते. जे पूर्ण आहे, टोट ल आहे, त्याची निश्चिती देखी ल अपूर्णपणातून होऊ शकते.

: ७ : आत्माभिमान कसा असावा?

---

त्वन्मतामृतबाह्यानां, सर्वथा एकांत वादिनाम् ।

आत्माभिमान दग्धानां, स्वेष्टं दृष्टे न बाध्यते ।। ७ ।।

अर्थ: जे लोक, हे भगवन, आपल्या विचार अमृताच्या प्रवाहाबाहेर आहेत, जे सर्व प्रकारे एकान्ताचा पक्ष घेत आहेत, जे स्वत:च्याच आप्तकल्पनेने दग्ध आहेत, ते सारेच, जे आता प्रत्यक्ष

अनुभवास येते म्हणजे प्रत्यक्ष दिसते, अनुभवास येते त्याचा स्वीकार करीत नसल्याने, मूढ आहेत, भ्रान्त आहेत.

स्पष्टार्थ विवेचन: आचार्य श्री समंतभद्र या कारिकेतून अन्य मतावलंबियांच्या बाबतीत, त्यांचे दोष दाखवीत आहेत. जिनवाणीच्या कल्याणकारी अमृताचा ज्यांना स्पर्शही झाला नाही, त्या अमृतमय वाणीचा अंशही ज्यांना चाखता येत नाही, अशी सारी मंडळी एकान्ताचा पक्ष धारण करतात.

विश्वाचे वैविध्य, वैचित्र्य इतके व्यापक आहे, इतके गूढ आहे की ते आग्रहाने अमुकच आहे, असे म्हणता येत नाही. जितक्या काही उपपत्या तत्वज्ञानात्मक आहेत, त्या सा-या अशात्मक आहेत. संपूर्ण विश्वाला व्यापेल व त्या परमसत्याला उद्‌घाटित करेल अशी स्थिती थोर थोर तत्ववेत्यांची ही नाही. त्याचे कारण म्हणजे त्यांची एकांतिक, एकच ते माझे खरे, अशी दृष्टी होय. जे जे विचार, ज्ञान आत्म्यातून प्रगट होते, ते सारे विचार वस्तूच्या कोणत्यातरी एकाच अंशाचे प्रतिपादन करते. तेव्हा इतरही विचार सह प्रवासी आहेत, स्वत:च्या विचाराबरोबर इतरही विचार प्रवाहांना समुचित आदर देणे हे विचारवंतचे कार्य आहे. जीवनात सामाजिक, सांस्कृतिक आचारात्मक किंवा बैध्दिक प्रवाह खळाळत असतात. ते सारे प्रवाह स्वत: अत्यंत उपयोगीही असतात. म्हणूनच सा-या विचार प्रवाहांना त्या त्या दृष्टीतून सामावून घेणे गरजेचे आहे.

माझेच तत्वज्ञान, माझाच देव, माझाच गुरु श्रेष्ठ अशा आत्यंतिक अहंकार हा त्या विचारातील माधुर्य, ऋजुत्व जाळून टाकतो. जीवन केवळ विचारावरही चालत नाही किंवा केवळ परंपरागत आचरणावरही चालत नाही. जितक्या प्रकारे ज्ञानाची अभिवृध्दी होत जाईल तितक्या प्रकारे जीवनात वैविध्य येत राहील. ही सारी विविधता, त्या वैविध्याचे सौंदर्य न पाहाता गर्वाने, अहंतेने एकच प्रश्न धरुन व त्याचा आत्यंतिक आग्रह करुन चालत नाही. आप्ताभिमान दग्ध असे आचार्य म्हणतात. आप्त असावा, देवत्व ध्यानी यावे व त्या आराध्य दैवताला शरण जावे, हे तर अगदी खरच आहे. देवत्व व गुरुत्व यांची संगत हवी. समागम हवा. त्या देवाची स्तुती, वंदना, पूजाही हवी, त्यातून एक प्रकारचे मानसिक बळ प्राप्त होते. निमित आहे अरिहंताची पूजा, पण ती ही मोठी कार्य-संपन्नता देते. म्हणून जे सारे त्या भगवंताच्या अमृत-प्रवाहापासून हट्टाने दूर आहेत, त्यांनीही प्रवाह-प्रविष्ट व्हावे, हा भाग महत्वाचा आहे. आचार्य श्री एकान्त वाद्यांना दोष

देत नसून त्यांना ही आमंत्रण देत आहेत की त्यांनी ही अनेकान्तवादी, सर्व समावेशक व समन्वयक अशा अमृत प्रवाहात यावे.

तसेच जे आज काल्पनिक अगोचर, अदृष्ट, कष्टमय वाटते, ते हळूहळू ज्ञानाच्या प्रकाशमय क्षेत्रात प्रविष्ट होणारे आहे. आजचे विज्ञान हे देखील जैन संस्कृतीच्या विविध संकल्पना स्पष्ट करीत आहे. म्हणून विज्ञान व जैनधर्म यांची सांगड घालणे व जीवनात शांती, सुख, समृद्धी आणणे महत्वाचे आहे. जीवन संकुचित तर तत्वही संकुचित राहाते. म्हणून जीवन जितके व्यापक आपण बनवू तितके तत्वज्ञानही व्यापक होत जाते. अस्मित असावी, पण अहंकार नसावा. अहंता विष आहे. त्या अहंकारातून सारे चांगलेही वाईट होऊन जाते. अहंकाराने आत्म्याचे सौंदर्य ज्ञानाची अस्मिता व आचारणाचे मृदुत्व, ऋजुत्व, संयम हेही दुःखदायक होते, म्हणूनच या कारिकेतून जीवनाचे जे परम, पवित्र मांगल्य आहे, ते जपायचे असेल व समन्वयात्मकता निर्माण करायची असेल तर एकान्त पक्षाचा अभिमान सोडायला हवा.

: ८ : एकान्ताची भूतबाधा

---

कुशलाकुशलं कर्म, परलोकश्च न क्वचित् ।

एकान्त-ग्रह-रक्तेषु, नाथ स्व-पर वैरिषु ।। ८ ।।

अर्थः हे प्रभो, जी मंडळी एकान्ताच्या भूतबाधेने ग्रस्त आहेत किंवा त्यातच रंगेलेली आहेत, ती सारी मंडळी परस्परांना न जाणून घेतल्याने व स्वतःच्याच अहंकाराने ग्रस्त असल्याने स्वतःचेही शत्रू व दुस-याचेही शत्रू झाले आहेत. त्यांच्या त्या गर्हित अहंकाराने शुभही घडत नाही व अशुभ काय तेही कळत नाही, तसेच इहलोकीचे कर्तव्ये कार्य व परलोकीची शुभा-शुभ फळे कोणती हेही त्यांना कळत नाहीत.

स्पष्टार्थ विवेचन: मोठे मनोरम, अत्यंत स्पष्ट कथ्ंन या कारिकेतून केले आहे. जे म्हणतात की ईश्वर आहे किंवा ईश्वर नाही किंवा कसले पाप वा कसले पुण्य, कसला धर्म, कोण सर्वज्ञ, कोण वीतराग, ते सारेच जण स्वत:चे वैरी आहेत. आपल्याच एकान्तिक विचारात, आचारात ती मंडळी गर्वाने रंगेन गेली आहेत. एकान्ताला वा एकाच तत्वाच्या हट्टाला ते भूतबाधा म्हणत आहेत. भूतबाधा झालेला माणूस जे बोलतो, वागतो, विचार करतो, ते त्याचे काही स्वत:चे नसते, भूताच्या आश्रयाने ते तसे बोलतात वा वागतात. जोपर्यंत एकान्त मान्यतेचे व त्याच्या अहंकाराचे पिशाच्य त्याच्या मानगुटीवर बसले आहे, तोपर्यंत त्यला स्वत:चा निर्णय करता येत यनाही. कोणतेही तत्वज्ञान, विचार किती ही चांगले श्रेष्ठ असले तरी ते संपूर्णपणे ऐहिक, पारमार्थिक जीवनात स्वीकारताना एकान्ताने म्हाजेच सर्वार्थाने ते उपयोगी पडत नाही. जसे अन्न शरीराला हवे, त्याने पोषण होते, पण सारखे खातच यराहाल तर मृत्यूच्या दारी जवे जागेल. हिसंला मान्यता दिली की लोक तुमचीच हत्या करतील. म्हणजे ती तुमची मान्यताच तुमची वैरी होईल. सा-या पापांचे अेच आहे. चोरीने काय वाईट होते, खूप परिग्रह साठविल्याने काय होते, खूप कामुक वागल्याने काम होते, अशा रीतीचा अशुभ विचार व आचारण केले तर त्यात तुमचाही नाश आहे व इतरांचाही नाश आहे. सारे विचार टाकोची भूमिका स्वीकारणारे अतील तर जीवनात दु:खाशिवाय काहीच असणार नाही. म्हणूनच समतोल (बॅलन्स) विचार हेच विवेकी माणसाला सुख-समृद्वी देतात. दान ही शुभक्रिया आहे, सेवा ही अत्यंत शुभक्रिया आहे, हे खरे. पण सारे सुदंर जीवन त्यासाठी खर्च करायचे नाही. शुभाशुभाच्या पलिकडे देखील तुमचे दिव्य भाव-जीवन आहे. मुक्तीची साधना, निर्वाणाची साधना करायची आहे. म्हणजे चांगले-वाईट याच्या विचारातूनही मुक्त होऊन अत्म-धर्मचा विचार प्रबळतेने केला पाहिजे. आत्मरतीचे सुख अतुत्तम आहे. स्व-मध्ये तल्लीने होण्याची स्वत:शी संवाद साधण्याची, अनुपम अशा अरिहंताच्या धर्मात सामिल होण्याची रीतही महत्वाची आहे. म्हून एकात्न स्वरुपाचा, हट्टाचा, आग्रहाचा मार्ग हा कही जीवन पोषक नाही. स्वत: चेही शत्रु होण्याचे टाळा ही विचारधारा फार महत्वाची आहे.

## : ९ : भाव-अभाव:एक शक्ती

---

भावैकान्ते पदार्थानामभावानामपन्हवात् ।

सर्वात्मकंअनाद्यंतं अस्वरुपकंअतावकम् ।। ९ ।।

अर्थ: हे परमात्म स्वरुप प्रभो, जर कुणी असे म्हणेल की विश्व हे केवळ अस्तित्वमयच आहे, त्यात काहि च नाश पावत नाहि , तर तेहि काहि खरे नाहि . 'अभाव' (नास्तिपणा) हि वस्तुस्थिती असताना ती नाकारणे हि विसंगत विचारसरणी आहे. कारण विश्वात केवळ अनादि, अनंत सर्वात्मकच सारे आहे, असे मानले तर 'नास्तित्व' स्वरुपाचा व पर्यायाने अस्तित्वाचाहि स्वी कार करता येत नाहि . हे मोठे अ-स्वभाविक व अपूर्ण व सदोष कथन आहे.

स्पष्टार्थ विवेचन: या गाथेतून आचार्य जे लोक केवळ टोटल एक्झिस्टन्स मानतात, कशाचाहि नाश होत नाहि असे मानतात, त्याच्या विचारात कुठेतरी अपरिपक्कपणा आहे. कारण आहे असे जेव्हा म्हणतो, तेव्हा तो नाही , च्या विरोधात असतो. जेव्हा हा प्राणी हत्ती आहे, असे म्हणतो, तेव्हा तो गाय, बैल, उंट नाहि असे त्यात गृहि त धरलेले असते. अमकी व्यक्ति जैन आहे असे म्हटले की ति हिंदू नाहि , मुस्लिम, बौद्ध नाहि , हे वेगळे सांगावे लागत नाहि . म्हणजे आहे हे स्वयमेव पूर्ण कथ्ंन नसून ते नाहि याच्याशी जोडले गेले आहे.

अभाव (नथिंगनेस) हि मोठि शास्त्रि परिकल्पना आहे. ती वैज्ञानिक आहे. आज पाश्चात्यांती ते अनेक विद्वान टोटल एक्झिस्टंस चा विचार करि त आहेत. अस्तित्व म्हणजे देखी ल जे नास्तित्वपणाने वेढलेले आहे, ते अस्तित्व होय, असे आता तेहि म्हणू लागले आहे.

जसे दुधाचे दहि झ्ंाले म्हणजे नेमके काय झ्ंाले? पूर्व आवस्था बदलली . ती कुठे गेली ? तेव्हा शास्त्रज्ञ सांगतात की पूर्व अवस्था एका अपेक्षेने नष्ट झाली व नवी न आवस्था उदयास आली . त्याला जैनागमात प्राकअभाव म्हणतात. अशा अभावात्मक वस्तुस्थिती चाहि विचार आवश्यक आहे. जी वन केवळ अस्तित्वात्मक (पॉझिटि व्) नाहि , तर त्याच्या जोडी ला निगेटि व्हचा विचारहि आहे.

काहि मंडळी हट्टाने (देखी ल) आत्म्याला टोटल एक्झिस्टंट (नित्य) मानतात. तसे मानणे देखी ल चुकी चे आहे. तसे मानले तर मग मुक्ती चा, निर्वाणाचा प्रश्नच उपस्थित होत नाहि . पण

प्रश्न निर्वाणाचा, मुक्ती चा आहे. म्हणून तर अरिहंताची देशना, प्ररुपणा, धर्म संसारि अवस्थेंत स्वी कारावा लागतो. जे ज्यावेळी आवश्यक तेथे जे भ्ंावात्मक (अस्तित्व) अवस्थेचे निरुपण हवे. उपयोग झाला, साध्यश ते प्रापत झ्ंाले की मग साधनाची गरज नुरते. म्हणून त्रैकालिक शुद्वता वर्तमानात कुणालाच (सिद्वभ्ंगवंत सोडून) नसते. जी मंडळी स्वत:ला आध्यात्मिक गुरु लाभला म्हणून एका सामान्य परिग्रही व दोषांनी युक्त अलेल्या माणसाला गुरु मानतात, त्यानां आधुनिक धर्म प्रोता मानतात, ते बहकलेले शिष्य आहेत. भारतात आा शिष्यांची मुळी च वाण नाही . म्हणून आज जे चमत्कारिक गॉडमेन आहेत, ईश्वरि अवतार आहेत, या विज्ञानमय विश्वात, त्यांनाही देशी -परदेशी शिष्य मंडळी आहेत. शिष्यही लोभि व गुरुही लोभि . आचार्याच्या काळात आणि ढोंगी , आपमतलबि , स्वत:च स्वत:चे शत्रु असणारे गुरु असावेत. त्यांना उघडे पाडण्याचे कार्य त्यांना त्याहि खडतर काळी करावे लागले आहे, ता तर्क करावा लागतो. जैन समाजात देखी ल, की जो समाज हजारो वर्षापासून अहिरंत-सिध्दयांनाच देवत्व देत आला आहे, त्याची च पूजा-अर्चा-वंदना करी त आला आहे, त्या समाजात थोडेफार अशा यप्रकारचे थोतांड चालू आहे. हे सारे प्रकार मानवाच्या लोभातून, लाभातून उदभवतात. म्हणून ज्या देवाची पूजा करायची , ज्याला गुरु मानायचा त्याचाहि परिक्षा करावि लागते.

: १० : परिवर्तनाचा विचार

---

कार्य-द्रव्यमनादि स्यात् प्राग्भावस्य निन्हवे ।

प्रध्वंसस्य च धर्मस्य प्रच्यवेऽनन्ततां व्रजेत ।। १० ।।

अर्थ: प्राक-अभाव (वस्तुंच्या पूर्व अवस्थेचा स्वी कार न केलातर) न मानला तर पूर्व अवस्थाच नव्हती असे मानता येणार नाही . म्हणजे सारे पदार्थ नित्य, शाश्वत मानावे लागती ल.

तसेच प्रध्वंस (नाश) अभाव मानला तरी ही तो पदार्थ वा वस्तु नित्य, शाश्वतच राहि ल. पण असा नित्यपणा प्रतयक्षात दिसत नाहि . म्हणजे प्राग-अभाव व प्रध्वसं अभाव असे दोन अभाव (नास्तित्व) न मानले तर सारि द्रव्य-व्यवस्थाच कोलमडून पडेल. पण तसे घडत नाहि .

स्पष्टार्थ विवेचन: आचार्यश्री या कारिकेतून वस्तू कायम नित्य नसते, तिच्यात क्षणाक्षणाला परिवर्तन होत असते, याचा खूलासा करतात. आजची दु:खे उद्या नसतात, आजचे दारिद्रय उद्या नष्ट होते. कालचा पंतप्रधान उद्या पंतप्रधान राहात नाहि . म्हणजे पूर्वि‍ची जी अवस्था आहे, ती नंतर नष्ट पावते व नवी न अवस्था प्राप्त होते. कालचे सुंदर सागवानाचे झाड, उद्या सुतार कापून दारे, खिडक्या, टेबल-खूर्च्या बनवितो. म्हणजे परिवर्तनाचा नियम सर्वत्र लागू आहे. कालचा संसारात भ्रमण करणारा जी व आज अरिहंत म्हणून पूज्य होतो, वंदनी य होतो. संसारहि कायम नाहि . पुरुषार्थ केला, जिनवाणी ने सांगितलेला मोक्षमार्ग स्वी कारला तर या यजी वाला अनंत ज्ञान, सुख, बी र्य, आनंद इ. गुण प्रक्ट करता येतात. अभावांचा स्वी कार नाहि केला तर परिवर्तन घडू शकत नाहि . तसे परिवर्तन आपण नित्य पाहतो. वाल्या कोळि चा वाल्मिकी महर्षि झाला. अनेक भवातून भ्रमण करी त व अनेक आपदांना सहन करी त महावी र प्रभू अरिहंत झालेत. म्हणून निष्क्रियते मूढतेचा, भ्रमाचा त्याग करुन श्रेष्ठतम निर्वाणाची प्रेरणा आचार्य देत आहेत.

## : ११ : सर्वात्मक सत्याचा शोध

---

सर्वात्मकं तदेकं स्यात् अन्याऽपोह व्यतिक्रमे ।

अन्यत्र समवाये न व्यपदिश्येत सर्वथा ।। ११ ।।

अर्थ : या कारिकेतून उरलेलया दोन अन्योन्य अभाव व अत्यंत अभाव या दोन नकारात्मक स्थिती चा विचार केला जात आहे.

एक पदार्थ किंवा वस्तु दुस-या स्वरुपाची नाही. (अनयोन्याभाव) असे न मानले तर सा-या वस्तु एकरुपच मानाव्या लागतील. कुठेही भेद स्वीकारायला जागा राहणार नाही. तसेच एक द्रव्य दुस-या द्रव्याहून आत्यंतिक वेगळे आहे, असे न मानले (अत्यंताभाव) तरी ही सारी चेतन-अचेतन द्रव्ये एकच मानावी लागतील.

स्पष्टार्थ विवेचन: या विश्वातील व्यवस्थेचा व आपल ज्ञानाचा मेळ कसा साधता येईल, याचा निर्वाळा आचार्य स्पष्टपणे देत आहेत. टेबल व खुर्ची एकच आहेत, कारण त्या लाकडाच्या आहेत, असे म्हटले तर चालत नाही. तुम्ही सुताराला टेबल करायला दिला व त्याने खुर्ची करुन आणुन दिली तर तुम्ही स्वीकारत नाही. सुतार म्हणेल. अहो, टेबल काय, वा खुर्ची काय, दोन्ही लाकडाच्याच ना. पण ते त्याचे विधान आपण स्वीकारत नाही. कारण त्याने जो हेतु दिला तो योग्य नव्हे.

तसेच ते म्हणतात की माती काय, मडके काय, दोन्ही मातीच ना! पण त्याचे म्हणणे सत्य वाटत असले तरी ते स्वीकारता येत नाही. मडक्याचे कार्य माती करु शकत नाही. पायात काटा मोटला, वेदना झाल्या तर असे म्हणून चालत नाही की काटाहि अचेतन व देहही अचेतन, त्यात एवढे विव्हळायला काय झाले? त्याचेही म्हणणे प्रत्यक्ष खोटे आहे.

इतकेच काय, एका द्रव्याची, पदार्थाची एका समयाची अवस्था म्हणजे देखील दुस-या समयाची अवस्था नव्हे. प्रत्येक अवस्था (पर्याय) स्वतंत्र आहे. त्या अवस्थाचे वेगळेपणा न स्वीकारले तर मग वस्तू बदलते, क्षणोक्षणी परिवर्तन पावते हेही मान्य करता येणार नाही. तुम्ही व्यापारासाठी एखादे मोठे दुकान लावता, लाख रुपये त्यासाठी खर्च करता. फर्निचर अत्यंत सुदरं रेखीव करता. त्यावेळी कुणी म्हटले की फर्निचर विकणार आहात कां? मग त्यासाठी एवढा खर्च कशासाठी? भव्य शो-रुम आपण पाहातो. आर्किटेक्टला पैसा यदेतो. शो-रुम सजवतो. भांडवल खर्चून जाहिराती करतो. करोडो रुपये जाहिरातीसाठी खर्च करतो. कां? आता तोही चार्च उत्लन्नसाठीच गृहीत धरला जातो. फर्निचर जाहिरात म्हणजे व्यापार नव्हे, दुकानातील मालही नव्हे. नोकर-चाकर ठेवतो. तो म्हणजेही दुकानातील माल नव्हे. असा अत्यंत अभाव दर्शविणा-या अनेक वस्तु आपण स्वीकारतोच की नाही. ते न स्वीकारले तर व्यापार, उदीम होत नाही. दुकानाचा व तुमचाही वास्तविक कहीच संबंध नाही. मल अचेतन व तुम्ही चेतन. तसे वेगळेपण (अत्यंताभाव) न मानले तर तुम्ही ही माल होऊन जाल. विक्रीची वस्तु होऊन जाल. म्हणून

अन्योन्य अभाव व अंत्यत अभाव व दोन अभावअवस्था (निगेटिव्ह पोझिशन्स) स्वीकारणे हे शाहणपणाचे, विवेकाचे आहे. मालक सर्व कामे करु शकत नाही. म्हणून आता मॅनेजमेंट नावाची संस्थां आली आहे. मॅनेजमेंट म्हणजे कामाचे वाटप, नियंत्रण रचना. तुम्ही आपले पुडया बांधत बसाल तर श्रीमंत कसे होणार ?

हे जसे व्यवहारात सांगितले, तेच मोक्षमार्गातही खरे आहे. आज तुम्ही मनष्य झालात. म्हणजे ती ही अत्म्याची अवस्था. ती ही बदलणार, नष्ट होणांर म्हणून जे मृत्युला घाबरतात ते देखील वरील तत्व जाणून घेत नाहीत. जन्म आहे तर मृत्युही आहे. ती सारी देहाची परिवर्तने आहेत. कही मडळी देहाला मती म्हणतात. पण रस्त्यावरची मती म्हणजे देह नव्हे. देहाची माती होणार म्हणून त्या देहाला आत्ताच माती (अचेतन) नाही म्हणता येत. त्या देहात आत्म (ज्ञानमय) बिराजमान आहे. त्या देहालाच यपायरी बनवून निर्वाणाची साधना करता येते. विनाशरीर अत्म साधना कुणी तरी केली आहे? नाही. पणं देह म्हणजेही अत्मा नव्हे. दोघांची जातकुळी एक नाही. ते अत्यंत भिन्न आहेत. यालाच भेद-विज्ञान असे नाव आहे. शरीर व अत्मा योनांच एकच मानणारेही चार्वाकारखे तत्वज्ञानी आहेत. आपणही सारे जीवन देहपूजेसाठीच नाही का घालवीत? स्वत:ला आपण जैन म्हणून घेतले तरी आपण आचरणाने, विचाराने चार्वाकच आहोत. देह व अत्मा यांच्यात अत्यंत अभाव आहे. म्हणजे देह म्हणजे आत्मा नव्हे, हे न जाणजे तर आपले जैनत्वही संपून जाइल. आचार्य श्री जैनतत्वज्ञानाची मांडणी मोठया खुबीने, रहस्यमयरीतीने पंरतु स्पष्टपणे कीत आहेत. ते स्वत: तार्किक अल्याने सतत त्यांच्या रचनेत किंवा मानसिकतेत तर्क, अनुमान, किंवा पत्यक्षात जे दिसते, अनुभवास येते, संवेदिले जाते त्याचाही ते सतत पाठपुरावा कतात. समवाय म्हणजे एकरुपता कुढे, किवे प्रमाणात, कोणत्या वेळी (म्हणजे स्थळ, काळ द्रव्य सापेक्ष) असेते, असणे शकय आहे, याचा विवेक ते जागृत करीत आहेत. तुम्ही भ्रांत होफ नये, संशयात सापप्डू नये, हे खरे की ते अशा भ्रमत तुम्ही राहू नये म्हणून ते भ्ंवात्मक (पॉझिाटिव्ह) विवेचन करतात, नंतर लगेच निगेटिव्ह बजू केती व ती पूरक कशी सहयोगी की हेही सांगतात. चित्त शांत, स्वच्छ, पारदर्शी असेल तर सत्य समजून घेणे सोपे जाते. म्हणून तुम्ही जे जीवन जगता, उद्योग-व्यापार करता, नोकरी करता, खाता-पिता, आनंदी जीवन घालविता, त्याहून तूम्ही नेमके कुछे उभे आहात, तुमची नेमकी जागा कोणती, हे पाहत आले पाहिजे. आंधळेपणाने जगायचे नाही. जे नाही आहे, त्याला नाही म्हणायचे नाही. जे जेवढयापुरते,

ज्याकाळी , ज्यास्थळी योग्य ते तसे स्वीकारायला हवे. हे च जाणत्या, नेणत्या मनाची रीत आहे, नकार देयाची , नकार स्वीकारण्याची मनाची तरि हवी . नकार हा देखील जीवनाचा भाग आहे. असे लग्न करता. पत्नी मरुन जाते. तिचा अभावही स्वीकृत करायला हवा. कारण त्या अभावातही सत्य आहे रडून करेलमडून सत्य नष्ट होत नाही . हेच तर समत्व होय. समत्व येते ते आा खंबीर, ख-या तत्वज्ञानातून.

: १२ : अभावात्मकतेने सत्यदर्शन

---

अभावैकान्त-पक्षेऽवि भावाऽ पन्हव-वादिनाम् ।

बोध-वाक्यं प्रमाण न केन साधन-दूषणाम् ।। १२ ।।

अर्थ : मागे जे चार अभाव (नास्ति पक्षाचे) सांगितले आहेत, ते चारही अभाव देखील एकान्त स्वरुपात घ्यायचे नाहीत. सारे जे परस्पर अपेक्षेने नाही असे पाहिले, त्यातून हट्टाने-आग्रहाने एकान्त करायचा नाही . कारण त्यातून अस्ति म्हणजे भावात्मक विचारांचा त्याग केल्यासारखे होईल. ज्ञान व आगम यांचा नीट स्वीकार केलातरच दोन्हीचे अस्तित्व मान्य करावे लागते. नाही तर प्रमाण मान्यतेत दोष येतो. सदोष साधनेतून सत्य प्रतिष्ठित होत नाही .

स्पष्टार्थ विवेचन: आता जी वस्तू तूम्ही पाहाता, जाणता त्या वस्तूतील नश्वरता (अभावावस्था) जाणा, तसेच तिचे भाव-स्वरुपही जाणा. क्षणोक्षणी जे बदल होतात त्यातून प्रत्यक्षपणे तशी उभयात्मक स्थिती दिसते. बाल्य हरवते, तारुण्य येते, तारुण्य नष्ट होते, वृद्धत्व

येते. हे सारे एकाच व्यक्तित घडते. म्हणून असे स्पष्ट पण् जाणायचे की वस्तू कथंचित अपेक्षेने भावात्मक व कथंचित्त अभावात्मक आहे.

मनात अनेक कल्पना तरंग उठतात, जुन्या कल्पना नष्ट होतात व नव्या उठतात. पण ते तरंग ज्या मनात उठतात ते मात्र तेवढयापुरते स्थित (नित्य) असते.

हे सांगायचे कारण की आपण जो हट्ट करतो की वस्तु नाशवंतच आहे. संसार असारच आहे, सारे जी वन केवळ दु:ख-व्याप्तच आहे, ते सोडून अपेक्षेने प्रत्येक कथन सुयोग्य आहे. तरच ते वचन प्रामाणी क मानले जाते. अस्तित्व व नास्तित्व अशा दोन अवस्था यापैकी अस्तित्व शाश्वत आहे, नास्तित्व हे बदलाच्या अपेक्षेने आहे. बुध्दाने शून्यवाद स्वी कारला, शंकाचार्यांनी मायावाद स्वी कारला व त्यांचे हट्टाने व एकान्ताने प्रतिपादन केले. त्यातूनच हा वाद उभा राहिला. आज तर विज्ञान सापेक्षतावादावरच प्रगत होत आहे. वस्तू अणवांकाने मोजली , जाणली जाते. ते अणवांक बदलले की वस्तू बदलते. आईनस्टाईन या शास्त्राज्ञाने अशा सापेक्षतेचे वर्णन करुन सर्व विज्ञानात क्रांतिकारक विचार प्रस्तूत केला. न्यूटन याने गुरुत्वाकर्षणाचा सिध्दांत प्रस्तापित केला. पण गुरुत्वाकर्षणालाही एक प्रतिपक्ष उभा राहिला आहे. पक्ष व प्रतिपक्ष म्हणजे अस्ति व नास्ति या दोन शिवाय वस्तूचे अस्तिरुप व नास्तिरुप कळत नाही . अत्माही तसाच आहे आज संसारी आहे, पण तेही त्याचे शाश्वतरुप नाही . मुक्ती चा विचार आहे, तो बध्दतेशी संबंधित आहे. बध्दता स्वी कारल्याशिवाय मुक्ती चा विचार संभवत नाही . नेहमी स्व-पक्षाची सिध्दता करायला, परपक्षाचाही आधार ध्यावा लागते, नाही तर सत्याचा बोध होत नाही .

---

विरोधान्नोभयैकात्म्यं स्याद्‌वाद-न्याय-विद्विषाम् ।

अवाच्यतैकान्तेऽप्युक्ति र्नाऽवाच्यमिति युज्यते ।। १३ ।।

अर्थ : जी मंडळी स्याद्‌वाद पध्दती ला द्वेष करतात, मानत नाही त व केवळ वस्तू एकान्ताने अस्तिरुप आहे वा नास्तिरुप आहे किंवा वस्तू अवचाच्य (अवचनी य-तिच्याबदल निश्चित काही सांगता येत नाही ) आहे असे म्हण तात त्यातून त्याचाही पक्ष सिध्द होत नाही . 'अ-वाच्य,' निश्चित काही सांगता येत नाही , असे म्हणणे देखी ल न्याय्य नाही . अवाच्य, अकथनी य आहे, या वाक्यातून देखी ल काही आहे याचा बोध होतो.

स्पष्ट ार्थ विवेचन : या कारिकेतून सर्वार्थाने वस्तू अशी च आहे, असे आग्रही मत प्रतिपादन करता येत नाही , तसेच वस्तू अशी नाही च, असेही म्हण ाता येत नाही . अस्ति व नास्ति म्हण ाजेच अस्तित्व व नास्तित्व हे दोन्ही परस्पर सापेक्ष मानून त्या दोन्ही पक्षाचा स्वी कार केला पाहिजे. जी वनाती ल सारी व्यवस्थाच अशी आहे. किंवा असेही जाण ाजे पाहिजे की विश्वाातच अशी स्वच्छ अनेकात्मक, वैविध्यात्मक रचता आहे. ते वैविध्य देखी ल एका विशिष्ट शाश्वतेवर आधारलेले आहे. तोच तर वस्तुगत धर्म आहे.

अशा अनंत वैविध्याला जे जाण त नाही त ते म्हण तात की अनेक गोष्टी या अनिवर्यनी य आहेत. काही च कळत नाही की अमके कसे आहे ? ते खरेही असते, कारण ज्ञानाला मर्यादा पडलेली आहे, इंद्रियाना मनाला मर्यादा पडलेली आहे. त्या मर्यादेला ओलांडता येत नाही , म्हणून अनिर्वचनी यता संभवते. पण अनिर्वचनी यता देखी ल एक कथन आहे. म्हण ाजे ज्ञानगमयच आहे. म्हणून केवळ वस्तू भावात्मकच (पॉझिटि व्हच) आहे किंवा अभावात्मक आहे किंवा सारेच अनिर्वचनी य आहे असे एकान्ताने म्हण ाता येत नाही . म्हणून हे प्रभो, आपण जो समवाय साधत आहात, स्यादवादाने सारे कथन करी त आहात, तेच योग्य आहे. एकान्त मान्यतेते दोष आहेत, अनेकान्तात निर्दोषता आहे. असा विचारच मनाला शांती देणारा व सर्व प्रश्नांची उकल करणारा आहे. शेकडो मैलावरी ल व्यक्तिचे भाषण आपण ऐकू शकतो. जे नट मृत आहेत, संगी तकार मृत आहेत त्यांची छबी , त्यांची गी ते आजही जणु ते प्रत्यक्ष अभिनय करी त आहेत, गात आहेत, हे अनुभवू शकतो. जे पूर्वी शक्य वाट त नव्हेते, ते आता शकय झाले आहे. दूरवरचे ग्रह-गोल अपण पाहू शकत नव्हतो, परंतु त्या ग्रहांचे फोटो घेो पाहेणे शक्य झाले आहे. नापी क जमी न सुपी क

होऊ शकली आहे. धान्याचे उत्पादन वाढू लागले आहे. हे सारे शकय कोटी तले वाटू लागले. कां ? तर ज्याचा आत्यंतिक अभ्ांव मनला, जे अनिर्वचनी य मानले होते, ते सारे आज प्रत्यक्षात उतरले आहे. म्हणून अशी भ्रांत धारणा कायची नाही की सारे भ्ांवात्मकच आहे किंवा अभावात्मकच आहे किंवा अनिर्वचनी यच आहे. स्थळ, काळ अपेक्षेने सारेच चित्र बदलत आहे. म्हून विश्वाती ल रचना ही अशी च कथचित भव, अभाव व अनिर्वचनी य आहे.

: १४ : कथचित्पणाचे माधुर्य

---

कथंचित् ते सदेवेष्ट ; कथंचित् असदेव तत् ।

तथोभववाच्यं च नय-योगान्न सर्वथा ।। १४ ।।

अर्थ : हे प्रभो, आपल्या देशनेत, उपदेशात आपण स्याद्वादाने वस्तु कथचित् सत् (अस्ति-रुप) कर्थचित् असतरुप, कथंचित् अवाच्य, तर कथचित त्रयात्मकही प्रतिपादन करता, ते योग्यच आहे. वक्त्याचा व श्रोत्यांचा जसा उदेश हेतु असेल त्याप्रमाणे वस्तुचे स्वरुप आहे, पण ती वचने सर्वथा, सर्वकाळी, सर्व जागी कथचित स्वरुपातच प्रमाण मानावी . आपला हा स्यादवाद (अनेकान्त) सवोनाच शंका रहित करतो.

स्पष्टार्थ विवेचन : यातून आचार्य श्री भगवंताच्या उपदेशाची सुपतिष्ठा करी त आहेत. ते म्हणतात- गुण व अवस्था यांनी युक्त ते द्रव्य आहे. गुण अविनाशी तर अवस्था विनाशी . अल्प ज्ञानामुळे काही काळी अवस्था व गुण यांचेही स्पष्ट आकलन होत नाही , म्हणून त्यावेळी ते अनिर्वचनी यही आहेत. आपआपल्या ज्ञानाच्या कक्षेत, ज्ञानाच्या मर्यादेतच माणूस विचार मांडतो, विचार सांगणे, मांडणे हे चांगलेच आहे, पण् स्वमताचा आग्रह धरणे हे विद्वनांना शोभत नाही . जो जे वांछी ल ते तो लाहो असा यविचार ज्ञाने।।वरही मांडतात. याचे कारण नाना प्रकारचे लोक, तर नाना प्रकारचे विचार, आचार संभवतात. तेव्हा त्या आचार-विचारांना त्या त्या काळी वा स्थळी

मान्यता असते. एका देशाचा प्रंतप्रधान असला तर तो कािह अन्य देशाचा पंतप्रधान नसतो. म्हाजेच तो पंतप्रधान आहेिह व नािह िह. गत जन्मात तुम्हि देव (स्वर्गाती ल) आल, पण या जन्मात मनुष्य आहात. गतकाळाच्या अपेक्षेने तुमचे देवत्विह खरे व आताच्या अपेक्षेन मनुष्यत्विह खरे आहे

: १५ : अमृत - सामंजस्याचे

सदेव सर्वं को नेच्छेत्स्वरुपादि - चतुष्ट यात् ।

असदेव विपर्यासान्न चेन्न व्यवतिष्ट ते ।। १५ ।।

अर्थ : हे प्रभो, इतक्या विवेचनानंतर असा कोण ज्ञानि पुरुष आहे की जो द्रव्य, क्षेत्र, काल व भाव यांच्या स्व-पर अपेक्षेने सत्-पर अपेक्षेने सत्, असत् व अवाच्य यांचा स्वी कार करणार नािह ?

अष्ट ार्थ विवेचन : या कारिकेतून सारे विचार-आचार कसे तपासून पाहायचे याचे एक सुंदर मार्गदर्शन आहे. म्हणजे त्यामुळे तत्त्वदर्शन सत्यस्वरू पात कळण्याचा मार्ग स्पष्ट होतो. द्रव्य (वस्तु), क्षेत्र (स्थळ) काळ, (वेळ) व भाव (अस्तित्व किंवा भावना) अशा चार निकषावर कोणतेिह स्टे टमेंट (वाक्य वा विचार) तपासून पाहायचे. ते तपासताना देखी ल स्व-अपेक्षेने व पर-अपेक्षेने तपासून पाहायचे. म्हणजे स्व-द्रव्य, स्व-क्षेत्र, स्व-काल व स्व-भाव, पर-द्रव्य, पर-क्षेत्र, पर-काल व पर-भाव अशा आठ त-हेने त्या विचारांचा मागोवा घ्यायचा. हे आठिह प्रकार नंतर अस्ति, नास्ति, अस्ति-नास्ति, अवक्तव्य, अस्ति अवक्तव्य, नास्ति अवक्तव्य, आस्ति-नास्ति अवक्त्वव्य अशा सात (स्याद्‌वादाने) प्रकाराने तपासून पाहायचे. म्हणजे प्रत्येक वचन हे ५६ (७x८) प्रकाराने तपासून, विचार करुन पहायचे. तसे केले तरच त्या वाक्याचा (स्टे टमेंट चा) विचार परिपूर्ण होतो.

जसे, 'जी व आहे', असे वाक्य घेतले तर ते वाक्य ५६ प्रकाराने म्हणजे जी व आहे, जी व नािह , जी व आहे व नाही िह, जी वाबद्दल बरेचसे कािह अवक्तव्य आहे, जी वाबद्दल बरेचसे अवक्तव्य नािह , जी वासंबंधि आस्ति-नास्ति असे बरेचसे अवक्तव्य आहे, असे सारे स्व-द्रव्य,

परद्रव्य, स्व-काळ, परकाळ, स्व-क्षेत्र, परक्षेत्र, स्व-भाव (विचार) व परभाव या दृष्टीने तपासून पाहिले तरच सम्यक् बोध होतो. म्हणजे प्रत्येक विचार अशा रीतीने ५६ प्रकाराने तपासून पाहिले पाहिजे. अरिहंतांचे जे सांगणे आहे, त्यांचे जे कथन आहे, ते तशा रीतीने पाहिले गेले तर तुमच्या मनात भ्रांती राहात नाही, अहंकार राहात नाही.

आचार्यांनी या पवित्र कारिकेतून भगवंतांच्या आप्तपणाची निर्दोषता व्यक्त केली आहे. हट्टाने किंवा आग्रहाने एखादा विचारच परिपूर्ण आहे, असे समजायचे नाही. विचार दृढ करतांना किंवा स्वीकारताना केवळ स्वत:चेच म्हणजे योग्य, ग्राह्य आहे असे न मानले तर अनेक विवाद, भांडणे, अहंकार, अंधुकता यांचा परिहार होतो. इतरांच्या विचारातील सत्यांशही स्पष्ट होतो. आपली समज, आपले ज्ञान हे तोकडे आहे. त्यामुळे दुस-या ज्ञानी माणसाने मांडलेल्या विचारांची सत्यता एकदम पटत नाही. ते विचार तुमच्या समजुतीला छेद देतात. तुमच्या पूर्व, संकुचित कल्पनांना धक्का बसतो.तुम्हाला ते विचार अनाकलनीय वाटतात. म्हणून जो ज्ञानी माणूस आहे, त्याने स्व-माताचा, वा परमताचा स्वच्छ, स्पष्ट असा मागोवा घेतला पाहिजे. कारण धर्म प्रतिपादक वक्ते, आप्त, गुरू अनेक आहेत व त्यांचे कथन, निरुपणही अनेक वेळा वेगवेगळे असेत, त्यात विरोध असल्याचेही दिसते. परंतु ज्यावेळी, ज्यास्थळी जे इष्ट आहे, योग्य आहे त्याचाच स्वीकार करायला हवा.

जसे, अहिंसेचा विचार आला, अहिंसेचे तत्त्वज्ञान सांगण्यात आले, तेव्हा असाही विचार आला की मग जगायचे कसे? शेती करायची, उद्योगधंदे उभारायचे, खायचे, प्यायचे, श्वासोच्छवास घ्यायचा तर हिंसा घडणारच. मग हिंसेची व्याख्या केली गेली. तेव्हा अगोदर असा विचार आला की संकल्प पूर्वक म्हणजे ' मी अमक्याला मारतो' अशा संकल्पाने हिंसा करायची नाही. म्हणजे अहिंसेच्या विचाराबरोबर हिंसेबद्दलही खूप मत-मतांतरांचाही विचार आला. गृहस्थांच्या दृष्टीने हिंसा - अहिंसा, सामाजिक, राजकीय, आर्थिक, जीवन विषयक, औद्योगिक, राज्यरक्षण, जीवरक्षण अशा विविध रीतीने मग हिंसा-अहिंसेचा विचार स्पष्ट होत गेला. जीव मारला जातो, त्याची हिंसा झाली, यापेक्षा ज्याच्याकडून ती हिंसा घडली त्याची व्यक्तिगत भावस्थिती ही ध्यानात घेतली गेली. जेथे जे आवश्यक व कर्तव्य म्हणून करायचे, ते केलेच पाहिजे असा अनेकांती विचार सर्वमान्य झाला.